दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com संपादक : अजय भांगे https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● शनिवार दि.१७ जानेवारी २०२६ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक १४४ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Saturday 17 January 2026 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 144 ● Pages 4 ● Rate 4 Rs







# २९ पैकी २५ महापालिकांवर भाजप महायुतीचा भगवा

## मतदारांचा विकासाला कौल; ठाकरे बंधुसह पवार काका पुतण्याला दणका

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुकीबाबत एक्झिट पोल्सनी वर्तवलेले अंदाज बव्हंशी खरे ठरले असून, भाजपच्या नेतृत्वाखालील महायुतीने या निवडणुकांत निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले आहे. तब्बल २५ महापालिकांवर महायुतीने सत्ता मिळवत ठाकरे बंधुंसह पवार काका पुतण्याला दणका दिला. विशेषतः मुंबई महानगर क्षेत्रासह राज्यातील प्रमुख शहरांमध्ये भाजप आणि शिवसेनेचा दबदबा ठळकपणे दिसून आला.राजधानी मुंबई महापालिकेत महायुतीने निर्णायक आघाडी घेत स्पष्ट बहुमत मिळवले आहे. भाजप ९० जागा जिंकत सर्वात मोठा पक्ष ठरला असून, शिवसेनेला २८ जागा मिळाल्या आहेत. मराठीच्या मुद्द्यावर एकत्र आलेल्या उबाठा गटाला ५७, तर राज ठाकरेंच्या मनसेला ९ जागांवर समाधान मानावे. काँग्रेसला अनपेक्षित १५ जागा मिळाल्या. राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांची स्थिती मर्यादित दिसून आली. रस्ते, रेल्वे, मेट्रो, पुनर्विकास, स्वच्छता आणि पाणीपुरवठा यांसारख्या मुद्द्यांवर मुंबईकरांनी विश्वास दाखवला असून, बहुपक्षीय लढतीतही महायुतीने बाजी मारली आहे.

ठाणे महापालिकेत शिवसेनेने ५५ तर भाजपने २५ जागा जिंकत सत्तेवर पकड मजबूत केली आहे. नवी मुंबईत भाजपने ६६ जागा जिंकून स्वबळावर सत्ता स्थापनेचा मार्ग मोकळा केला आहे. या ठिकाणी शिवसेनेला ४२ जागा मिळाल्या. मीरा-भाईंदरमध्ये भाजपने ७४ जागांसह एकहाती सत्ता मिळवली, तर शिवसेना आणि इतर पक्ष पिछाडीवर राहिले. कल्याण-डोंबिवलीत शिवसेना (५१) आणि भाजप (४८) यांनी मिळून महायुतीचा किल्ला अबाधित ठेवला. उल्हासनगरमध्ये भाजप (३८) आणि शिवसेना (३६) यांची सरशी झाली, तर भिवंडी-निजामपूरमध्ये काँग्रेस सर्वाधिक जागा मिळवून पुढे असली तरी सत्ता स्थापनेचा मार्ग त्यांच्यासाठी खडतर दिसून येत आहे. हितेंद्र ठाकुरांनी गड राखला पालघर जिल्ह्यातील वसई-विरार महापालिकेत मात्र वेगळे चित्र पाहायला मिळाले. येथे हितेंद्र ठाकूर यांच्या बहुजन विकास आघाडीने ७१ जागा जिंकत सत्ता कायम राखली, तर भाजपला ४३ जागांवर समाधान मानावे लागले. रायगड जिल्ह्यातील पनवेल महापालिकेत भाजपने ६० जागा जिंकून निर्विवाद वर्चस्व मिळवले असून, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय



विमानतळ, औद्योगिक विकास आणि पायाभूत सुविधांचा फायदा महायुतीला झाला.

नागपुरसह पुणे, पिंपरी चिंचवडमध्ये भाजपची सरशी - पुणे महापालिकेत भाजपने ९० जागांसह स्पष्ट बहुमत मिळवत आपले वर्चस्व कायम ठेवले. आयटी हब, मेट्रो, स्मार्ट सिटी आणि वाहतूक व्यवस्थेच्या मुद्द्यांवर पुणेकरांनी भाजपला कौल दिला. याशिवाय पिंपरी-चिंचवडमध्ये भाजपने ८४ जागा जिंकत मोठा विजय मिळवला असून, नाशिक (७६), छत्रपती संभाजीनगर (५८) आणि नागपूरमध्ये तब्बल १०२ जागा जिंकत भाजपने आपली ताकद दाखवून दिली आहे. नागपूरमध्ये काँग्रेस आणि उबाठा-शरद पवार गट एकत्र असूनही भाजपचा झंझावात त्यांना थांबवता आला नाही. - एकूणच राज्यातील २९ महापालिकांच्या निकालांमधून शहरी मतदारांनी विकासाभिमुख धोरणे, खंबीर नेतृत्व आणि स्थिर प्रशासनाला पसंती दिल्याचे स्पष्ट झाले आहे. महायुतीला मिळालेले हे यश जिल्हा परिषदेसह विधानस परिषदेच्या निवडणुकांच्या दृष्टीने महत्त्वाचे मानले जात आहे. कोणत्या पक्षाला किती जागा? मुंबई - भाजप ९०, शिवसेना २८, उबाठा ५७, मनसे ९, काँग्रेस १५, राष्ट्रवादी अजित पवार ३, शरद पवार १ ठाणे - शिवसेना ५५, भाजप २५, शरद पवार ११, राष्ट्रवादी अजित पवार ८, उबाठा १ नवी मुंबई - भाजप ६६, शिवसेना ४२, उबाठा २, मनसे १ पनवेल - भाजप ६०, शिवसेना २, राष्ट्रवादी २, उबाठा ५, काँग्रेस ४, मीरा-भाईंदर - भाजप ७४, शिवसेना ३, काँग्रेस १३, उबाठा ०, मनसे ० वसई-विरार - बविआ ७१, भाजप ४३, शिवसेना १, उबाठासह अन्य पक्ष ० कल्याण-डोंबिवली - शिवसेना ५१, भाजप ४८, उबाठा ९, मनसे ५, काँग्रेस २, शरद पवार १ उल्हासनगर - भाजप ३८, शिवसेना ३६, काँग्रेस १ भिवंडी-निजामपूर - काँग्रेस ३०, भाजप २२, शिवसेना १२, शरद पवार १२ पिंपरी-चिंचवड - भाजप ८४, राष्ट्रवादी ३७, शिवसेना ६ पुणे - भाजप ९०, राष्ट्रवादी २०, काँग्रेस १०, शिवसेना २, नाशिक - भाजप ७६, शिवसेना २९, राष्ट्रवादी ३, उबाठा ९, मनसे १, काँग्रेस ३ मालेगाव - शिवसेना १८, भाजप २ छत्रपती संभाजीनगर - भाजप ५८, शिवसेना १२, उबाठा ६, काँग्रेस १, शरद पवार १ नागपूर - भाजप १०२, शिवसेना २, काँग्रेस ३३, राष्ट्रवादी १, उबाठा २


# राज्यात वंचितचा बोलबाला; मातब्बर यांना मागे पाडत धडाकेबाज कामगिरी

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । प्रतिनिधी**

यावेळच्या महापालिका निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीने आपले उमेदवार उतरवले होते. या निवडणुकीत राज्यभरात अनेक ठिकाणी वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार निडवून आले आहेत.

राज्यात २९ महापालिकांच्या निवडणुकीत कोणाचा विजय होणार याकडे सर्वांचेच लक्ष लागले होते. या निवडणुकीत विजयी कामगिरी करण्यासाठी सर्वच पक्षांनी कंबर कसून प्रचार केला होता. पुणे, पिंपरी चिंचवड, नागपूर, मुंबई, नवी मुंबई, ठाणे यासारख्या महापालिकांत कोण बाजी मारणार याची सर्वांनाच उत्सुकता लागली होती. विशेष म्हणजे मुंबई पालिकेवर सत्ता मिळावी यासाठी भाजपा, शिंदे यांच्या महायुतीने तर चांगलाच जोर लावला होता. दुसरीकडे ठाकरे बंधूंनीही मोठी ताकद लावली होती. याच मुंबईत आणि राज्यात इतरही ठिकाणी काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडी यांच्या युतीनेही जोर लावला होता. असे असतानाच आता वंचित बहुजन आघाडी या पक्षाने चांगली



कामगिरी केली आहे. या पक्षाचे नांदेड, मुंबई, परभणी, छत्रपती संभाजीनगर या महापालिकांत अनेक उमेदवार निवडून आले आहेत. वंचितचे नेमके कोण-कोणत्या ठिकाणी उमेदवार विजयी झाले ते जाणून घेऊ यावंचितचे कोणत्या महापालिकेत कोणते उमेदवार विजयी झाले?

नांदेड महानगरपालिका निवडणुकीत प्रभाग ७ (ड ) मधून वंचित बहुजन आघाडीचे प्रशांत इंगोले हे विजयी झाले आहेत. याच नांदेड महानगरपालिका निवडणुकीत प्रभाग ७ (अ) मधून वंचित बहुजन आघाडीचे राहूल सोनसळे हेदेखील विजयी झाले आहेत. छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका निवडणुकीत प्रभाग ३ (क) मधून वंचित बहुजन आघाडीच्या करुणा मेघानंद जाधव विजयी झाल्या आहेत. याच महापालिकेत प्रभाग ३ (ड) मधून वंचित बहुजन आघाडीचे अफसर खान यासीन खान यांनी विजयी झेंडा फडकवला आहे. छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका निवडणुकीत प्रभाग ३ (अ) मधून वंचित बहुजन आघाडीचे अमित भुईगळ यांनी दणदणीत विजय मिळवला आहे.

अकोल्यातही दमदार कामगिरी

अकोल्यातही वंचितने दमदार कामगिरी केली असून येथे प्रभाग १४ (ड) मधून वंचित बहुजन आघाडीचे शेख शमशू कमर शेख साबीर हे विजयी झाले आहेत. याच अकोला महापालिकेत प्रभाग १४ (ब) मधून वंचित बहुजन आघाडीच्या जयश्री बहादूरकर या विजयी झाल्या आहेत. अकोल्यातच प्रभाग १४ (अ) मधून वंचित बहुजन आघाडीच्या उज्वला पातोडे या विजयी झाल्या आहेत. अकोल्यात प्रभाग १४ (क) मधून पराग गवई आणि प्रभाग ३ (ड) मधून निलेश देव यांचाही विजय झाला आहे. लातूर महापालिकेत प्रभाग १३ (अ) मधून वंचितचे अमोल लांडगे विजयी झाले आहेत .

# संकटात सोबतीला; कर्करोगग्रस्तांच्या मदतीसाठी खा.सोनवणेंचे प्रयत्न

## पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधीतून ३ लाखांची मदत मंजूर

दैनिक वादळ वार्ता

**बीड । प्रतिनिधी**

कुंभेफळ (ता.केज) येथील ऋषिकेश बाळासाहेब घाडगे यांच्या कर्करोग उपचारासाठी खा.बजरंग सोनवणे यांच्या प्रयत्नातून पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधीमधून ३ लाख रुपयांची आर्थिक मदत मंजूर करण्यात आली आहे. यामुळे 'संकटात सोबतीला, दारात अवतरला, देवमाणूस अवतरला', अशी भावना रूग्ण आणि नातेवाईकांनी व्यक्त केली आहे.



ऋषिकेश यांच्यावर औरंगाबाद येथील डॉ.रवींद्र कोडलीकेरी मेमोरियल हॉस्पिटल, येथे कर्करोगावरील उपचार सुरू आहेत. उपचारासाठी येणाऱ्या खर्चाचा काही भाग भागवण्यासाठी ही आर्थिक मदत देण्यात आली असून, रुग्णालयास थेट खर्चाच्या तपशीलासह आवश्यक कागदपत्रे पंतप्रधान कार्यालयाकडे सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

पंतप्रधान कार्यालयाच्या पत्रानुसार, मंजूर करण्यात आलेली रक्कम ही उपचारादरम्यान झालेल्या प्रत्यक्ष खर्चापुरतीच मर्यादित राहणार आहे. तसेच रुग्णालयाने उपचाराची संपूर्ण जबाबदारी स्वीकारून रुग्णाची माहिती व उपचाराचा तपशील वेळेत सादर करणे आवश्यक आहे. रुग्णाच्या अर्जाची नोंद २० डिसेंबर २०२५ रोजी पंतप्रधान कार्यालयात झाली होती. या आर्थिक मदतीमुळे कर्करोगासारख्या गंभीर आजाराशी झुंज देणाऱ्या ऋषिकेश आणि त्यांच्या कुटुंबीयांना मोठा दिलासा मिळाला आहे. या प्रकरणात खा.बजरंग सोनवणे यांनी पाठपुरावा केल्याने मदत मंजूर झाली आहे. सर्वसामान्य गरजू रुग्णांसाठी पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधी हा मोठा आधार ठरत असून बीड जिल्ह्यातील रूग्णांसाठी खा.बजरंग सोनवणे कायम पाठपुरावा करताना दिसत आहेत. आजवर अनके रूग्णांना त्यांच्यामुळे मदत झालेली असून संकटकाळी हक्काचे खासदार म्हणून सोनवणे यांच्याकडे मदतीचा हात मागीतला जात आहे. जिल्ह्यातील रूग्णांना मदत मिळून देण्यासाठी खा.सोनवणे यांनी स्वतंत्र यंत्रणा तयार केली आहे. संबधित यंत्रणेच्या माध्यमातून कमीत कमी वेळेत मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न होताना दिसत आहेत.

## वादळी कट्टा

फाईल हलली नाही, तरी हात हलवला,
नियम कागदावर सरळ, खिशात मात्र वाकवला,
सेवेचा फलक झळकतो दारावर मोठा,
न्याय मिळाला तेव्हा दर आधीच ठरवला.

खुर्ची स्वच्छ दिसते, मनात मात्र डाग,
नोटांचा वास लागताच बदलतो सारा राग,
जनतेचा प्रश्न रांगेत रोज कुजतो,
भ्रष्टाचार मात्र रोजच फोफावत जातो.

तोंडावर शपथ, हातात सही,
खिशात भरलेले मौन काही,
न्याय म्हणे थांबा थोडा,
नोट आली की वेळ उरली नाही.

लाच नाही म्हणे, फक्त भेट,
भेटीतच सुटतो सगळा सेट,
जनतेचा विश्वास तुटत जातो,
भ्रष्टाचार मात्र रोजच पेटत जातो.

संपादक
अजय भांगे



# नाथ शिक्षण संस्थेच्या वतीने सेवानिवृत्त मुख्याध्यापक सायस गित्ते यांचा सत्कार

## ह.भ.प.प्रभाकर महाराज झोलकर यांची उपस्थिती

दैनिक वादळ वार्ता

**बीड । प्रतिनिधी**

परळी नाथ शिक्षण संस्थाच्या वतीने सेवानिवृत्त मुख्याध्यापक सायस गित्ते यांचा अभिष्टचिंतन सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्त नाथ शिक्षण संस्थाचे सह सचिव प्रदीप खाडे यांनी शाल, फेटा बांधून, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन पेढा भरवत सत्कार केला. ह. भ. प. प्रभाकर महाराज झोलकर व उद्योजक सुरेश नाना फड यांची उपस्थिती होती. तसेच सर्वांना मकर संक्रांतीच्या शुभेच्छा दिल्या.

शहरातील विद्यानगर येथील निवृत्तीनाथ निवास येथे बुधवार दि. १४ जानेवारी रोजी नाथ शिक्षण संस्थाच्या वतीने सेवानिवृत्त मुख्याध्यापक सायस गित्ते यांचा अभिष्टचिंतन सोहळा उत्साहात



साजरा करण्यात आला. याप्रसंगी नाथ शिक्षण संस्थाचे सह सचिव प्रदीप खाडे यांच्या हस्ते शाल, फेटा बांधून, श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन पेढा भरवुन सत्कार करण्यात आला. वाढदिवस अभिष्टचिंतनाच्या निमित्ताने विविध क्षेत्रातील मान्यवरांकडूनही सेवानिवृत्त मुख्याध्यापक सायस गित्ते यांच्यावर दिवसभर शुभेच्छांचा वर्षाव झाला. यावेळी ह. भ. प. प्रभाकर महाराज झोलकर, नाथ शिक्षण संस्थेचे सहसचिव प्रदिप खाडे व उद्योजक सुरेश नाना फड, सामाजिक कार्यकर्ते माधवराव प्रभाकरराव दहिफळे, पंचायत समितीचे सहाय्यक प्रशासन अधिकारी निळकंठ दराडे, आदर्श शिक्षक अंकुश फड, राजाभाऊ होळंबे, धोंडीराम चाटे , भागवत चाटे, हरिश्चंद्र सोनवणे सर, मधुकर जोगदंड, कराड सर, महादेव गित्ते, भगवत देवकते, पत्रकार महादेव गित्ते, आदी उपस्थिती होते.


# केज तालुक्यातील देवगावचे भूमिपुत्र उत्तरेश्वर (अण्णा) मुंडे यांना सुभेदार मेजर म्हणून पदोन्नती

## आज ग्रामस्थांच्या वतीने सत्काराचे आयोजन

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील देवगाव येथील ऊत्रेश्वर (अण्णा) महिपती मुंडे यांची सुभेदार मेजर पदी नुकतीच पदोन्नती झाली, त्यांच्या झालेल्या पदोन्नती पुढील कार्यास शुभेच्छा देण्यासाठी देवगाव येथील गावकऱ्यांच्या वतिने भव्य सत्कार करण्यात येणार असुन प्रमुखपाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्ते हनुमंत भोसले सर यांची उपस्थिती राहणार आहे. या बाबत सविस्तर वृत्त असे की,देवगाव येथील फौजी ऊत्रेश्वर (अण्णा) महिपती मुंडे यांची सुभेदार मेजरपदी पदोन्नती झाली त्यांच्या या प्रेरणादायी प्रवास युवकांना लाभदायक ठरेल ग्रामीण भागातील युवक जिद्द चिकाटी परिश्रमाने यश गाठु शकतो बद्दल त्यांचे मा.जि.प.उपाध्यक्ष, विक्रम बप्पा मुंडे,कॅप्टन राम नागरगोजे,रमाकांत बापु मुंडे,मा.जिल्हा परिषद सदस्य विजयकांत भैय्या मुंडे,सरपंच अतुल दादा मुंडे,अँड.नवनाथ मुंडे,अँड.वैजनाथ बापु मुंडे,पत्रकार महादेव गायकवाड,सामाजिक कार्यकर्ते गणेश मुंडे, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे केज तालुका




उपाध्यक्ष बालासाहेब मुंडे, ग्राम पंचायत सदस्य रामेश्वर नागरगोजे, संपादक आशोक नागरगोजे यांनी अभिनंदन करुन पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत.देवगाव येथील ग्रामस्थांनी आज सकाळी ९-०० वाजता हाकार्यक्रम आयोजित केला आहे.

# संपादकीय

## भारताचे ‘बाहुबली’ यश

नुकतेच ‘इस्रो’चे प्रचंड क्षमतेचे ‘बाहुबली’ रॉकेट प्रक्षेपित करून देशाने आत्मनिर्भरतेच्या दिशेने एक पाऊल पुढे टाकले. या प्रक्षेपणाचा लाभ अनेक क्षेत्रांना होणार असून ‘डायरेक्ट-टू-स्मार्टफोन’ ही नवी तंत्रज्ञान प्रणाली कार्यान्वित झाल्यामुळे देश प्रगतिपथावरून वेगाने वाटचाल करू शकणार आहे. शिक्षण, आरोग्य, शेती, व्यापार आदी क्षेत्रांना विनाखंडित इंटरनेट मिळण्याचे अनेक लाभ बघायला मिळतील.भारतीय अंतराळ संशोधन संस्था म्हणजेच ‘इस्रो’ने पुन्हा एकदा जागतिक स्तरावर कर्तृत्वाचा झेंडा फडकावला. २४ डिसेंबर २०२५ रोजी श्रीहरिकोटा येथील सतीश धवन अंतराळ केंद्रातून एलव्हीएम ३-एम ६ या भारताच्या सर्वात शक्तिशाली रॉकेटचे यशस्वी प्रक्षेपण करण्यात आले. प्रचंड क्षमतेमुळे या रॉकेटला ‘बाहुबली’ असे टोपणनाव देण्यात आले. हे केवळ एक रॉकेट प्रक्षेपण नव्हे, तर अंतराळ क्षेत्रातील भारताच्या वाढत्या व्यावसायिक ताकदीचे आणि ‘आत्मनिर्भर भारत’ या संकल्पनेचे एक जिवंत प्रतीक आहे. या मोहिमेद्वारे अमेरिकेचा ‘ब्लू बर्ड ब्लॉक-२’ हा महाकाय उपग्रह अवकाशात स्थापित करण्यात आला असून त्याचा थेट परिणाम आगामी काळात आपल्या मोबाईल वापरावर होणार आहे. या प्रक्षेपणाचा सर्वात मोठा आणि थेट फायदा सामान्य मोबाईल वापरकर्त्यांना मिळणार आहे. सध्या मोबाईलवर इंटरनेट वापरण्यासाठी आपण जमिनीवरील टॉवर्सवर अवलंबून असतो. मात्र, ब्लू बर्ड ब्लॉक-२ उपग्रहाच्या यशस्वी प्रक्षेपणामुळे ‘डायरेक्ट-टू-स्मार्टफोन’ ही नवी तंत्रज्ञान प्रणाली कार्यान्वित होणार आहे. यामुळे सामान्य ४ जी आणि ५ जी स्मार्टफोन्सना कोणत्याही विशेष उपकरणाशिवाय थेट अंतराळातून कनेक्टिव्हिटी मिळेल. यामुळे दुर्गम डोंगरदऱ्या, समुद्र किंवा मोबाईल टॉवर्स लावणे अशक्य असणाऱ्या ठिकाणीही आता हाय-स्पीड ब्रॉडबँड इंटरनेट उपलब्ध होईल. जगातील ‘डिजिटल दरी’ कमी होण्यास मदत होईल आणि ग्रामीण भागातील नागरिकही जागतिक माहिती तंत्रज्ञानाशी जोडले जातील. एलव्हीएम ३-एम ६ ने अवकाशात सोडलेला ब्लू बर्ड ब्लॉक-२ हा उपग्रह एका फिरत्या ‘मोबाईल टॉवर’सारखा काम करतो. सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे याचा २२३ चौमीचा विशाल अँटेना. इतका मोठा असल्यामुळेच तो पृथ्वीपासून ५०० ते ६०० किलोमीटर उंचीवरून तुमच्या खिशातील लहानशा मोबाईलमधील कमकुवत सिग्नल पकडून प्रतिसाद देऊ शकतो. पारंपरिक सॅटेलाइट इंटरनेटसाठी घराच्या छतावर एक विशेष ‘डिश’ लावावी लागते; परंतु या तंत्रज्ञानात उपग्रह थेट फोनमधील एलटीई ५जी लहरींशी संवाद साधतो. या मोहिमेचा सर्वात मोठा आणि थेट फायदा व्होडाफोन आयडियाच्या वापरकर्त्यांना मिळण्याची शक्यता आहे.

बीएसएनएल विशेषतः आपत्कालीन सेवा, लष्करी गरजा आणि अतिदुर्गम भागातील नागरिकांसाठी सॅटेलाइट मेसेजग आणि कॉल सेवा सुरू करण्यावर भर देत आहे. रिलायन्स जिओ आणि भारती एअरटेल सध्या ‘स्टारलक’ आणि ‘वनवेब’ यांसारख्या सेवांशी स्पर्धा किंवा सहकार्य करण्याच्या तयारीत आहेत. मात्र या सेवा सुरुवातीला ‘फिक्स्ड वायरलेस क्सेस’ यावर केंद्रित असू शकतात. भविष्यात फोनच्या ‘नेटवर्क सेटग्स’मध्ये ‘सॅटेलाइट रोमग’ असा पर्याय दिसू शकेल. तो सुरू केल्यानंतर तुम्ही टॉवरच्या कक्षेबाहेर गेल्यावरही फोन सुरू राहील. ही सेवा प्रामुख्याने समुद्रात मासेमारीसाठी जाणारे कोळी, हिमालयात जाणारे ट्रेकर्स, जंगलातील रिसॉर्टस आणि राष्ट्रीय महामार्गावरील सिग्नल नसणाऱ्या जागांवरून प्रवास करणाऱ्या लोकांसाठी वरदान ठरेल. या तंत्रज्ञानाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे वापरकर्त्याला काहीही नवीन खरेदी करण्याची गरज नाही. म्हणजेच सॅटेलाइट फोन किंवा ‘स्टारलक’सारख्या छतावर बसवण्याच्या अँटेनाची गरज भासणार नाही. सध्याचा ४जी/५जी एलटीई तंत्रज्ञान असणारा स्मार्टफोनच उपग्रहाशी जोडला जाईल. या तंत्रज्ञानामुळे मोबाईल टॉवरची रेंज नसणाऱ्या ठिकाणी तुमचा फोन आपोआप उपलब्ध उपग्रह सिग्नल शोधेल. हे तंत्रज्ञान ‘रोमग’प्रमाणेच काम करेल. या सेवेअंतर्गत सुरुवातीच्या टप्प्यात वापरकर्ते आपत्कालीन एसएमएस, साधे मेसेज आणि व्हॉईस कॉल करू शकतील. लवकरच टेलिकॉम कंपन्या ग्राहकांसाठी ‘सॅटेलाइट ऑन डिमांड’ प्लॅन्स आणू शकतात. उदाहरणार्थ, तुम्ही हिमालयात ट्रेकला जाणार असाल तर काही दिवसांसाठी सॅटेलाइट कनेक्टिव्हिटीचा पॅक घेऊ शकाल. या प्रक्षेपणामुळे देशाच्या कानाकोपऱ्यात हाय-स्पीड इंटरनेट पोहोचेल. शिक्षण आणि आरोग्यासाठी त्याचा फायदा होईल. चक्रीवादळ, पूर आल्यावर जमिनीवरील टॉवर्स कोसळले तरी उपग्रहाद्वारे मिळणारे नेटवर्क बचावकार्यासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरेल. ग्रामीण भागातील शेतकरी आणि छोटे व्यावसायिक उपग्रहाद्वारे इंटरनेटशी जोडले गेल्यामुळे थेट बाजारपेठेशी संपर्क साधू शकतील. यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळेल.

दुसरी बाब म्हणजे आजही ग्रामीण भागातील दुकानांमध्ये नेटवर्क नसल्यास यूपीआय व्यवहार फेल होतात. मात्र ‘बाहुबली’ उपग्रहामुळे मिळणाऱ्या स्थिर नेटवर्कमुळे अगदी दुर्गम भागातील किराणा दुकानातही डिजिटल पेमेंट सहज शक्य होईल. फळे, भाजीपाला, औषधे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेताना ट्रकच्या ट्रॅकसाठी नेटवर्क आवश्यक असते. मात्र महामार्गावरील ‘ब्लॅक स्पॉट’मुळे यात अडचण येते. आता ही अडचणही सुटणार असून रिअल-टाइम ट्रॅकग शक्य होईल. सध्या खेड्यापाड्यातील बरीच मुले यूट्यूब किंवा इतर शैक्षणिक प्सवरून अभ्यास करतात. पण पावसाळ्यात, खराब हवामानात फायबर तुटल्यास यात खंड पडतो. सॅटेलाइट इंटरनेटमुळेही अडचणही दूर होणार आहे. आणखी एक बाब म्हणजे छोट्या शहरांमध्ये तज्ज्ञ डॉक्टरांची नेहमीच कमतरता असते. असे असताना सॅटेलाइट कनेक्टिव्हिटीमुळे ग्रामीण भागातील रुग्ण मोठ्या शहरातील डॉक्टरांशी व्हिडीओ कॉलद्वारे संपर्क साधू शकतील. वेळीच उपचार मिळून अनेकांचे जीव वाचू शकतील. याबरोबरच सरकारी सेवांमध्येही याची मदत होईल. जसे की, सातबारा उतारा काढणे, आधार अपडेट करणे, पीक विम्याचे अर्ज भरणे अशा कामांसाठी चॉईस सेंटर, ग्रामपंचायतीत इंटरनेट लागते. आता सॅटेलाइटमुळे या सेवांचे सर्व्हर कधीही ‘डाऊन’ राहणार नाहीत. या सेवेचा लाभ होमस्टे आणि हॉटेल व्यवसायालाही होईल. आपल्याकडे कोकण, सह्याद्रीचे गडकिल्ले, गडचिरोलीसारख्या भागांमध्ये पर्यटन वाढत आहे. मात्र सध्या बऱ्याच पर्यटकांना ‘वर्क फ्रॉम होम’ची इच्छा असते. नेटवर्क नसल्यास अशांची अडचण होते. मात्र सॅटेलाइट इंटरनेटमुळे अशा ठिकाणी ‘वर्केशन’ ही संकल्पना रुजेल आणि स्थानिक तरुणांना रोजगाराच्या संधी मिळतील.‘बाहुबली’ रॉकेटची ही झेप भारताच्या कानाकोपऱ्यांतील शेवटच्या माणसाला ‘डिजिटल इंडिया’चा खरा भाग बनवणार आहे. इस्रोचे हे ‘बाहुबली’ प्रक्षेपण भारताला ‘सॅटेलाइट-टू-स्मार्टफोन’ क्रांतीच्या शर्यतीत जगातील आघाडीच्या देशांच्या रांगेत उभे करत आहे.

# केज पंचायत समितीत वर्ककोडचा घोटाळा उघड बीडीओ च्या मर्जीने नरेगात नियमबाह्य ‘प्रमा’

## ए.पी.ओ ची सही नाही,तरीही कोट्यवधींची नरेगा कामे मंजूर!

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

केज पंचायत समिती येथील नरेगा विभागात धक्कादायक प्रकार उघडकीस आला असून, नरेगा प्रमुख सहाय्यक कार्यक्रम अधिकारी (ए पीओ) यांच्या टिपणीवर परवानगी अथवा स्वाक्षरी न घेता थेट प्रशासकीय मान्यता व कार्यारंभ आदेशकाढून वर्ककोड तयार करण्यात आल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे.विशेष म्हणजे,हासर्व प्रकार गटविकास अधिकारी (बीडीओ) यांच्या थेट संमतीने व मनमानी कारभारातून सुरू असल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे.नियम व शासनआदेशांना धाब्यावर बसवून कामकाज केल्यामुळे नरेगा योजने तील पारदर्शकतेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.खालील कामांना एपीओ ची सही नसताना ही प्रशासकीय मान्यता (प्रमा) देण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे.खडीकरण कामे,पाणंद रस्ते,विहिरी,गाय गोठे, फळबाग लागवड,वृक्ष लागवड या सर्व कामां साठी नरेगा मार्गदर्शक सूचनांनुसार सहाय्यक कार्यक्रम अधिकारी (ए पी ओ) ची लेखी मंजुरी आवश्यक असते,मात्र ती डावलून वर्ककोड काढण्यात आली आहे.

**जिल्हा पातळीवर नियंत्रण शून्य?**

**अत्यंत गंभीर बाब म्हणजे,मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच उपमुख्य कार्यकारी अधिकारी (नरेगा),जिल्हा परिषद बीड यांचे या प्रकारावर कोणतेही नियंत्रण किंवा कारवाई दिसून येत नाही.त्यामुळे हा प्रकार केवळ पंचायत समितीपुरता मर्यादित नसून वरपर्यंत साटेलोटे आहे का? असा सवाल उपस्थित होत आहे.**




नरेगा ही योजना ग्रामीण गरिबांसाठी असताना, नियमबाह्य मंजुरी देऊन लोकांच्या हक्काच्या रोजगारावर आणि सरकारी निधीवर डल्ला मारला जात असल्याचा आरोप आता जोर धरू लागला आहे.जर एपीओ ची सही आवश्यक नसेल, तर मग नरेगा कायदा, शासन परिपत्रके आणि मार्गदर्शक तत्त्वे फक्त कागदावरच आहेत का? असा प्रश्न नागरिक विचारत आहेत.या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर तात्काळ कारवाई करावी,तसेच बेकायदेशीररित्या काढलेले सर्व वर्ककोड रद्द करण्यात यावेत,अशी जोरदार मागणी सामाजिक कार्यकर्ते व नागरिकांकडून होत आहे.

# शहरामध्ये मकर संक्रांतीचा उत्साह ओसंडून वाहताना तिळगूळ घ्या,गोड गोड बोलाच्या शुभेच्छा देऊन मकर संक्रांत साजरी

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

केज शहरासह परिसरात मकर संक्रांतीचा सण आज अत्यंत उत्साहात आणि पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात आला. तिळगूळ घ्या,गोड गोड बोला म्हणत एकमेकांना शुभेच्छा देत नागरिकांनी स्नेहाचा संदेश दिला. शहरात सकाळपासूनच मंदिरांमध्ये भाविकांची मांदियाळी आणि घराच्या गच्चीवर पतंगांची रंगत पाहायला मिळाली.

**बाजारपेठेत खरेदीची लगबग अन् सुवासिनींचे पूजन**

मकर संक्रांत सणा निमित्त मागील आठ दिवसांपासून केजच्या मंगळवार पेठ आणि कानडी रोड भागात मोठी गर्दी होती.सुगडे,ऊस,बोरं, गाजर आणि तिळाच्या खरेदीसाठी बाजारपेठ फुलून गेली होती.सकाळी सुवासिनींनी पारंपरिक पद्धतीने सुगडांचे पूजन केले.दुपारी ३ वाजेपासून पूजेचा मुहूर्त असल्याने शहरातील विविध मंदिरांत महिलांची



वाणदेण्यासाठी आणि हळदी कुंकवासाठी मोठी लगबग दिसून आली.

**आकाशात पतंगांची झुंज नायलॉन मांजाला फाटा**

तरुणाईमध्ये पतंगबाजी चा जबरदस्त उत्साह पाहायला मिळाला.केज शहराच्या विविध भागांतील घराच्या गच्ची वरून काट रे काट च्या घोषणा ऐकू येत होत्या. विशेष कौतुकास्पद बाब म्हणजे,प्रशासनाने केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत केजच्या नागरिकांनी ’नायलॉन मांजा’ वापरणे टाळल्याचे चित्र दिसले.

**मंदिरांमध्ये धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल**

केज शहरातील प्रमुख मंदिरांमध्ये मकर संक्रांतीला विशेष धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. शिक्षक कॉलनी,हनुमान मंदिर,गणपती मंदिर, राष्ट्रसंत भगवान बाबा मंदिर व इतर देवस्थाने शुक्रवार पेठेतील बालाजी मंदिर,देशपांडे गल्लीतील समर्थ मठ,वकीलवाडी तील हनुमान मंदिर. या सर्व ठिकाणी विशेष पूजा-अर्चा करण्यात आली.मकर संक्रांतीच्या मुहूर्तावर दानधर्माला महत्त्व असल्याने अनेकांनी गरजूंना मदत केली.सूर्यदेवाला तिळाचे लाडू आणि गुळाच्या पोळीचा नैवेद्य दाखवून कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.तिळगुळ घ्या गोड गोड बोला म्हणत सर्वांना मकर संक्रांतीच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

# देवाधी देव महादेव यात्रेनिमित्त खडक मांजरी येथे कीर्तन सोहळा उत्साहात संपन्न

दैनिक वादळ वार्ता

**लोहा । राजकुमार पिल्लोळे**

लोहा तालुक्यातील खडक मांजरी येथे देवाधी देव महादेव यात्रेनिमित्त खडक मांजरी शिवारातील महादेव मंदिर परिसरात नाथ महाराजांचा अभंग व कीर्तनाचा भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात ह.भ.प. एकनाथ महाराज हारसदकर यांच्या रसाळ व ओघवत्या वाणीतून प्रभावी कीर्तन सादर करण्यात आले.

किर्तनाच्या माध्यमातून एकनाथ महाराजांनी शिवतत्त्वाचे सखोल विवेचन केले. काहीही प्राप्त करण्यासाठी ज्ञान आवश्यक आहे. शिव म्हणजेच शक्ती असून जग निर्माण करण्याची ताकद त्याच्यात आहे, असे ते म्हणाले. महादेवाचे ‘पशुपती’ हे नाव स्पष्ट करताना त्यांनी सांगितले की, तो पशु-पक्ष्यांचा पालनकर्ता, स्वतंत्र, सर्वज्ञ आणि अमर आहे. शिव आपल्या पेक्षा वेगळा असून त्याचे ज्ञान प्राप्त करणे हेच खरे ध्येय आहे, असेही



त्यांनी नमूद केले.

देव ठेविले तसे रहावे, अनंत तैसे रहावे, या अभंगाच्या माध्यमातून शिवाचे रूप, स्वरूप आणि त्याचे तत्त्वज्ञान समजावून सांगण्यात आले. अभंगाच्या शेवटच्या चरणात -

एका जनार्धनी जीवाचे जीवन, सर्वाघटी पूर्ण शिव जाणा

या ओळींमधून शिव सर्वत्र व्यापलेला आहे, हा भाव अधोरेखित करण्यात आला.

किर्तनात शिव-शक्ती तत्त्वाचे सुंदर विवेचन करताना ब्रह्म आणि माया यांच्या संयोगातून ईश्वराची निर्मिती कशी होते, याचे उदाहरण मराठी मुळाक्षरांच्या आधारे देण्यात आले. ‘अ’ हे ब्रह्मस्वरूप, ‘आ’ हे मायास्वरूप असून दोन्ही एकत्र आल्यावर ‘इ’ म्हणजेच ईश्वर तयार होतो. ईश्वरापासून सृष्टीची निर्मिती होते व ‘उ’ पासून उत्पत्ती घडते, असे तात्त्विक स्पष्टीकरण देण्यात आले. पुरुष आणि स्त्री यांच्या एकत्र येण्यानेच संततीची निर्मिती होते, त्याचप्रमाणे शिव आणि पार्वती म्हणजेच शिवशक्ती एकच असल्याचे प्रतिपादन करण्यात आले.

अमृतानुभव ग्रंथातील पहिल्या प्रकरणाचा उल्लेख करत, जो गृहस्थ हा ग्रंथ वाचेल त्याचा संसार उत्तम होईल, कारण शिव आणि शक्ती प्रेमाने एकत्र राहतात, असेही एकनाथ महाराजांनी सांगितले. या कीर्तन सोहळ्यास टाळकरी, मृदंगाचार्य, भजनी मंडळ, विणेकरी तसेच गावकरी व तसेच हरसद ,कारेगाव,शिवणी (जा)शेवडी (बा)या पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. भगवान शिवाच्या चरणी सेवा अर्पण करून हा कीर्तनाचा कार्यक्रम भक्तिमय वातावरणात संपन्न झाला.

# नंदुरबार पोलिसांची कारवाई: शहाद्यातील आंतरराज्य मेंढीचोर टोळी गजाआड

## १० लाखांच्या मुद्देमालासह ७ जण ताब्यात

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार । दिपक गोसावी**

शहादा पोलीस ठाण्याच्या हद्दीत गेल्या काही दिवसांपासून मेंढपाळांची झोप उडवणाऱ्या आंतरराज्य टोळीचा नंदुरबार स्थानिक गुन्हे शाखा आणि शहादा पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. या धडक कारवाईत पोलिसांनी ७ आरोपींसह एका विधीसंघर्षग्रस्त बालकाला ताब्यात घेतले असून, त्यांच्याकडून १० लाख १० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईमुळे चोरीचे एकूण तीन गुन्हे उघडकीस आले आहेत.३१ डिसेंबर २०२५ रोजी शहादा तालुक्यातील शेतांमधून मेंढ्या चोरीला गेल्याच्या तक्रारी झाल्या होत्या. पोलीस अधीक्षक श्रवण दत्त एस. यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेने तांत्रिक तपास सुरू केला. तपासादरम्यान, चोरीचा माल विकत घेणारा आरोपी मोहसिन ऊर्फ राजा हारुन खान (राहणार. राजपूर,



जिल्हा बडवाणी, मध्य प्रदेश) याला पोलिसांनी ताब्यात घेतले. त्याच्या चौकशीतून राजस्थानमधील चिंटू बंजारा आणि त्याच्या टोळीचे नाव समोर आले.ही टोळी अत्यंत नियोजनबद्ध रित्या चोरी करत असे. रात्रीच्या वेळी मेंढपाळांच्या वाड्यांमधून मेंढ्या चोरून त्या वाहनांच्या सहाय्याने मध्य प्रदेशात विक्रीसाठी नेल्या जात होत्या. पोलिसांनी सापळा रचून राजस्थानमधील बुंदी जिल्ह्यातील ५ आरोपी आणि मध्य प्रदेशातील एका आरोपीला अटक केली आहे.

पोलिसांनी या कारवाईत गुन्ह्यात वापरलेली वाहने आणि इतर साहित्य जप्त केले आहे. यामध्ये :

एक इको कार (RJ20UB5627)

एक पांढऱ्या रंगाचा ’छोटा हत्ती’ (DOST LS)

एक HF डिलक्स मोटारसायकल

मेंढ्या विक्रीतून मिळालेली रोख रक्कम आणि चोरीसाठी लागणारी साधने. ही यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक श्रवण दत्त एस., अपर पोलीस अधीक्षक आशित कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील, शहादा पोलीस निरीक्षक हेमंतकुमार पाटील, पोलीस सब इन्स्पेक्टर विकास गुंजाळ, मुकेश पवार आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केली आहे. पुढील तपास शहादा पोलीस करत असून या टोळीकडून आणखी काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

# जि.प.रामबाग शाळा वडवणी येथे हळदी कुंकू कार्यक्रम संपन्न

**दैनिक वादळ वार्ता**
**वडवणी । प्रतिनिधी**

दिनांक १५ जानेवारी २०२६ गुरुवार रोजी सकाळी ११:०० वाजता जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, रामबाग (वडवणी) येथे सखी सावित्री समिती बैठक, महिला मेळावा आणि मकर संक्रांतीनिमित्त हळदी-कुंकू समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती संगीता तिडके मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम अत्यंत खेळीमेळीच्या आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.



कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून झाली. यावेळी शाळेतील विद्यार्थिनींनी सुस्वागतम हे स्वागत गीत सादर करून आलेल्या पाहुण्यांचे स्वागत केले. विशेष म्हणजे, केंद्रस्तरीय स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावलेल्या आम्ही शिवकन्या या गीताचे सादरीकरण मुलींनी केले, ज्याला उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली. तसेच, धीमी धीमी या गाण्यावरील मुलींच्या नृत्याने सर्वांची मने जिंकली.

या सोहळ्याचे अध्यक्षस्थान नगरसेविका तथा महिला व बालकल्याण सभापती सौ. रंजनाताई नागेश डिगे यांनी भूषविले. कार्यक्रमास शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष श्री. गणेश दादा टकले यांची विशेष उपस्थिती लाभली. प्रमुख पाहुणे म्हणून डॉक्टर सौ. हंगे मॅडम, सौ. चंद्रकला धस मॅडम, सौ. सुरेखा मसुरे, श्रीमती बर्गे मॅडम आणि श्रीमती माळी मॅडम उपस्थित होत्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका श्रीमती संगीता तिडके मॅडम यांनी केले, ज्यात त्यांनी शाळेच्या उपक्रमांची माहिती दिली. या महिला मेळाव्यात उपस्थित मान्यवरांनी आणि शिक्षकांनी 'शिक्षणाचे महत्त्व' यावर उपस्थितांना मार्गदर्शन केले.

खेळ आणि आनंदाची उधळण:

महिलांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी यावेळी विविध मनोरंजक खेळांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये जनरल नॉलेज स्पर्धा, संगीत खुर्ची आणि उखाणा स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धांमध्ये महिलांनी मोठ्या संख्येने भाग घेतला.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे शिक्षक श्री. दिपक आळणे सर, श्री. नवनाथ घुले सर, श्री. सुभाष लतीबे सर, श्रीमती केदार मॅडम यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचालन श्रीमती कुंभार मॅडम यांनी केले, तर उपस्थितांचे आभार श्रीमती केकाण मॅडम यांनी मानले.

या सोहळ्यासाठी शाळेतील माता-पालक पूजाताई टिपरे, सौ. प्रणालीताई हेंद्रे, सौ. लक्ष्मीताई टकले, सौ. वरवडे ताई, सौ. नीताताई भैरे, बाकळे ताई, शिंदे मॅडम, सौ. निर्मला गळांगे, सौ. रोहिणी राऊत, सौ. घोडके ताई, सौ. चव्हाण ताई, सौ. अलगट ताई, सौ. डीगे, सौ. भैरट, सौ. कुरकुटे सौ आशा आळणे यांच्यासह मोठ्या संख्येने महिला पालक उपस्थित होत्या.

कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांना तिळगुळ, वाण आणि अल्पोपहार (चिवडा व पेढा) वाटप करण्यात आला. गोड आठवणींनी या सुंदर सोहळ्याची सांगता झली

## रांझणी आश्रमशाळेत उद्यापासून मकर्मण्य महोत्सवाचा धडाका; महोत्सवाच्या तयारीला वेग

**दैनिक वादळ वार्ता**
**नंदुरबार । दिपक गोसावी**

रांझणी येथील श्री साईनाथ शिक्षण संस्थेच्या विद्यावर्धिनी निवासी प्राथमिक आश्रमशाळा, रांझणी येथे शनिवार दि. १७ जानेवारीपासून तीन दिवसीय ङ्कर्मण्य महोत्सवाचेफ भव्य आयोजन करण्यात आले आहे. आदिवासी विकास विभागाच्या आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांच्या कला, क्रीडा आणि सांस्कृतिक गुणांना वाव देण्यासाठी हा नाविन्यपूर्ण उपक्रम राबविला जात असून, सध्या शाळेत या महोत्सवाच्या तयारीची लगबग अंतिम टप्प्यात आली आहे. शनिवार, १७ जानेवारी रोजी सकाळी १० वाजता नाशिक आदिवासी विकास विभागाचे अप्पर आयुक्त दिनकर पावरा यांच्या हस्ते या महोत्सवाचे उद्घाटन होणार आहे. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून आमदार राजेश पाडवी, आमदार आमश्या पाडवी, प्रकल्प अधिकारी अनय नावंदर, भाजपा जिल्हाध्यक्ष निलेश माळी आदी उपस्थित राहणार आहेत. उद्घाटनानंतर दुपारी क्रीडा स्पर्धांना सुरुवात होईल, तर सायंकाळी माजी जि.प. सदस्य प्रताप वसावे यांचे प्रबोधनपर व्याख्यान होणार आहे.

महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी, १८ जानेवारीला संस्थेच्या वतीने कोठार, रांझणी व प्रतापपूर गावासाठी सीएसआर फंडातून प्राप्त रुग्णवाहिका व २९ सोलर हायमस्ट लाईटचे लोकार्पण करण्यात येणार आहे. हा कार्यक्रम संस्थेचे अध्यक्ष डॉ. शशिकांत वाणी यांच्या अध्यक्षतेखाली व एस जे व्ही एन कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पार पडेल. या तीन दिवसांत विद्यार्थ्यांच्या चित्रकला, रांगोळी स्पर्धा आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले आहे.

**असे असेल महोत्सवाचे स्वरूप:-**

१७ जानेवारी उद्धाटन, माजी विद्यार्थी सन्मान सोहळा आणि क्रीडा स्पर्धा.

१८ जानेवारी रुग्णवाहिका लोकार्पण, चित्रकला-रांगोळी स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रम.

१९ जानेवारी ङ्कश्यामची आईफ एकपात्री नाट्यप्रयोग आणि भव्य पारितोषिक वितरण.

या तीन दिवसीय महोत्सवामुळे आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. संस्थेच्या दोन्ही आश्रमशाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेत आहेत.

## कराड हॉस्पीटलच्या वतीने दरवर्षी देण्यात येणारा रिपोर्टर ऑफ द इयर पुरस्कार प्रा.फुटके यांना प्रदान

**दैनिक वादळ वार्ता**
**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

अखिल भारतीय मराठी पत्रकार संघ संलग्न परळी पत्रकार परिषद द्वारा आयोजित 'दर्पण दिन' व 'मुकनायक दिन' सोहळा उत्साहात संपन्न झाला. या सोहळ्यात दै. सकाळचे तालुका प्रतिनिधी प्रा प्रविण फुटके यांना कराड हॉस्पीटलच्या वतीने दरवर्षी देण्यात येणारा रिपोर्टर ऑफ द इयर पुरस्काराने मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.




अखिल भारतीय मराठी पत्रकार संघ संलग्न परळी पत्रकार परिषद द्वारा आयोजित 'दर्पण दिन' व 'मुकनायक दिन' सोहळ्याचे आयोजन येथील लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयात शुक्रवारी (दि.१६) करण्यात आले होते. शहरातील कराड हॉस्पीटलच्या वतीने दरवर्षी एका पत्रकाराला रिपोर्टर ऑफ द इयर पुरस्काराने गौरविण्यात येते. यंदा हा पुरस्कार कराड हॉस्पीटलच्या वतीने संचालक डॉ बालासाहेब कराड व डॉ शालिनीताई कराड यांनी दै. सकाळचे तालुका प्रतिनिधी प्रा प्रविण फुटके यांना जाहीर केला. हा पुरस्कार अखिल भारतीय मराठी पत्रकार संघ संलग्न परळी पत्रकार परिषद द्वारा आयोजित 'दर्पण दिन' व 'मुकनायक दिन सोहळ्यात महाराष्ट्रातील जेष्ठ सुप्रसिद्ध विचारवंत यमाजी मालकर, शहराच्या नगराध्यक्षा पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी, जेष्ठ पत्रकार शंकर आप्पा मोगरकर, नगरसेवक पवनकुमार मुंडे, रिपाईचे युवानेते सचिन कागदे यांच्या हस्ते शॉल, श्रीफळ, सन्मानचिन्ह व रोख रक्कम देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने विद्यार्थी, पत्रकार, नागरिक उपस्थित होते.

## चौसाळा शहरात ग्रामपंचायतच्या वतीने स्वच्छता अभियान



**दैनिक वादळ वार्ता**
**चौसाळा । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील सर्वात मोठी समजली जाणारी चौसाळा ग्रामपंचायत असुन याठिकाणी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानातर्गत माझ गाव माझी मायभुमी हे ब्रीद वाक्य घेवुन चौसाळा शहरात स्वच्छता अभियानाला सुरुवात झाली असुन शहरातील वार्ड क्रमांक ०५ मध्ये हे अभियान राबवण्यात आले यावेळी वार्ड क्रमांक ०५ चे ग्रामपंचायत सदस्य प्रतिनिधी म्हणुन किशोर ढोकणे यांच्या मार्गदर्शनाखाली हे अभियान राबविण्यात आले यावेळी ग्रामपंचायत सदस्य प्रतिनिधी किशोर ढोकणे,लखन जोगदंड, पप्पू पवार, प्रकाश हांगे,दादाराव ढोकणे,प्रदीप कुलकर्णी, आप्पा नाईकवाडे,बाजीराव नाईकवाडे इत्यादी उपस्थित होते.

# तळोदा तालुक्यामध्ये अरुणोदय सिकलसेल अभियानाचा बिगुल

**दैनिक वादळ वार्ता**
**नंदुरबार । दिपक गोसावी**

सार्वजनिक आरोग्य विभाग महाराष्ट्र शासनाच्या वतीने राज्यभर राबवण्यात येणाऱ्या 'अरुणोदय' ह्या सिकलसेल निमिया विशेष अभियानाचा तळोदा तालुक्यात शुभारंभ करण्यात आला आहे. १५ जानेवारी ते ७ फेब्रुवारी या कालावधीत चालणाऱ्या या मोहिमेच्या पूर्वतयारीसाठी आणि नियोजनासाठी नुकतीच एक विशेष कार्यशाळा पार पडली. जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी (जि.प.) आणि जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यशाळेचे अध्यक्षपद जिल्हा क्षयरोग अधिकारी तथा तालुक्याचे नोडल अधिकारी डॉ.महेंद्र चव्हाण यांनी भूषवले. कार्यशाळेत मार्गदर्शन करताना डॉ.महेंद्र चव्हाण यांनी, या मोहिमेअंतर्गत ० ते ४० वयोगटातील सर्व लाभार्थ्यांची सिकलसेल तपासणी करणे अनिवार्य आहे. तपासणीनंतर सिकलसेल पीडित आणि वाहक यांची माहिती तत्काळ ऑनलाइन पोर्टलवर नोंदवावी. जेणेकरून भविष्यातील



उपचार आणि नियोजनासाठी अचूक डेटा उपलब्ध होईल.या कार्यशाळेला तालुका आरोग्य अधिकारी डॉ.दिनेश वळवी, वैद्यकीय अधीक्षक डॉ.रोहित वसावे यांच्यासह डॉ.विशाल चौधरी, डॉ.प्रशांत पवार, डॉ.सुधीर ठाकरे, डॉ.योसेफ गावित, डॉ.गणेश पाडवी व डॉ.वीरेंद्र पावरा उपस्थित होते. तसेच विस्तार अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी , आरोग्य सहाय्यक, आरोग्य सेवक आणि आशा गट प्रवर्तकांनी मोठ्या संख्येने मोठ्या संख्येने उपस्थित राहून मोहिमेच्या यशस्वितेसाठी निर्धार व्यक्त केला.

# शेलघरचे तुकाराम नारायण घरत यांची अकरावी पुण्यतिथी साजरी

## वडिलांच्या स्मृतिप्रीत्यर्थ महेंद्रशेठ घरत यांची जासई हायस्कूलला दहा संगणकांची भेट








**उरण । प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष, सामाजिक कार्यकर्ते महेंद्रशेठ घरत यांचे वडील दिवंगत तुकाराम नारायण घरत यांची अकरावी पुण्यतिथी बुधवारी साजरी करण्यात आली. तुकाराम नारायण घरत यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत हिरीरीने सहभाग घेतला होता. त्यावेळी त्यांना तुरुंगातही जावे लागले, परंतु ते मागे हटले नाहीत. त्यांनी त्याकाळी शैक्षणिक, सामाजिक चळवळ राबवली. तोच वसा आज महेंद्रशेठ घरत यांनी घेतला असून सामाजिक कार्यात त्यांनी सर्वसामान्यांच्या हृदयात स्थान निर्माण केले आहे. वडिलांच्या पुण्यतिथीनिमित्त महेंद्रशेठ घरत यांनी जासई हायस्कूलला दहा संगणकांची भेट देऊन आगळीवेगळी श्रद्धांजली वाहिली. हा कार्यक्रम उलवे नोड मधील 'भूमिपुत्र भवन'मध्ये झाला.

यावेळी माजी खासदार रामशेठ ठाकूर म्हणाले, महेंद्रशेठ यांनी आपल्या वडिलांचा वारसा उत्तमरित्या चालविला आहे. दिवंगत ज. आ. भगत यांची प्रेरणा घेऊन तो सर्वच क्षेत्रांत धडाडीने काम करतोय. वडिलांच्या नावे ज्युनियर महाविद्यालय, तर आईच्या नावाने यमुना सामाजिक, शैक्षणिक संस्था सुरू करून गोरगरिबांसाठी शैक्षणिक कार्य त्याने जोमाने सुरू ठेवले आहे. त्याबद्दल त्याचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे. आम्ही निवडणुकीपुरते राजकारण करतो, बाकी आमच्या मैत्रीत बाधा येणार नाही, याची काळजी आम्ही घेतो. यावेळी 'पैशाने तुटली नाती' हे नाटक सादर करण्यात आले. आगरी बोली भाषेतील हे नाटक रसिकांनी डोक्यावर घेतले. खचाखच भरलेल्या 'भूमिपुत्र भवन'मध्ये रसिकांच्या टाळ्यांनी कलाकारांची मने जिंकली. भूमिपुत्र भवनमध्ये 'पैशाने तुटली नाती' हे पहिल्यांदाच नाटक सादर करण्यात आले. त्यामुळे कलाकार, रसिक यांच्या प्रेमाला भरते आले होते.दिवंगत तुकाराम नारायण घरत यांना श्रद्धांजली वाहाण्यासाठी माजी खासदार रामशेठ ठाकूर, उरण नगरपालिकेच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा भावना घाणेकर, माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, दिबांचे पुत्र अतुल पाटील, महेंद्रशेठ यांचे सासरेबुवा रामशेठ म्हात्रे, माजी पंचायत समिती सदस्य भाऊशेठ पाटील, माजी सरपंच वसंत म्हात्रे, साई मंदिरचे अध्यक्ष रविशेठ पाटील आदी शेकडो मान्यवर उपस्थित होते.दरम्यान, यमुनाबाई सामाजिक शैक्षणिक संस्थेच्या गव्हाण येथील न्यू इंग्लिश स्कूल आणि खारकोपर येथील दिवंगत तुकाराम नारायण घरत ज्युनिअर कॉलेजमध्येही पुण्यतिथी साजरी करण्यात आली.

# बोरद ग्रामपंचायतीत दिव्यांग बांधवांसाठीचा विशेष 'महाकॅम्प' उत्साहात संपन्न; शेकडो दिव्यांगांना मिळणार रोजगाराची संधी!

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार । दिपक गोसावी**

दिव्यांग व्यक्तींना शासकीय योजनांचा लाभ मिळावा आणि त्यांना रोजगाराच्या मुख्य प्रवाहात आणता यावे, या उद्देशाने बोरद ग्रामपंचायत आणि युथ फॉर जॉब्स फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेले विशेष मार्गदर्शन व नोंदणी शिबिर आज शुक्रवारी (दि. १६) मोठ्या उत्साहात संपन्न झाले. या शिबिराच्या माध्यमातून परिसरातील दिव्यांग बांधवांना युडीआयडी कार्डासह मोफत कौशल्य प्रशिक्षणाची मोठी भेट मिळाली आहे.

केवळ कागदपत्रांची जमवाजमव न करता, दिव्यांग व्यक्तींना स्वतःच्या पायावर उभे करणे या उद्देशाने या कॅम्पचे नियोजन करण्यात आले होते. 'युथ फॉर जॉब्स फाउंडेशन' तर्फे उपस्थित दिव्यांगांना त्यांच्या आवडीच्या क्षेत्रात मोफत कौशल्य प्रशिक्षण देण्याचे जाहीर करण्यात आले. या प्रशिक्षणानंतर त्यांना नामवंत संस्थांमध्ये रोजगारासाठी विशेष सहकार्य केले जाणार आहे, ज्यामुळे दिव्यांग बांधवांमध्ये आत्मविश्वासाचे वातावरण निर्माण झाले आहे. अनेक दिव्यांग बांधवांचे युडीआयडी कार्ड अपडेट नसल्याने त्यांना योजनांपासून वंचित राहावे लागत होते. आजच्या शिबिरात तज्ज्ञांमार्फत खालील बाबींचे यशस्वी निराकरण करण्यात आले: जुन्या कार्डांचे अद्ययावतीकरण.पात्र लाभार्थ्यांची युडीआयडी पोर्टलवर ताजी नोंदणी. दिव्यांग प्रमाणपत्र मिळवताना येणाऱ्या अडचणींवर थेट मार्गदर्शन. हे शिबिर यशस्वी करण्यासाठी बोरदच्या लोकनियुक्त सरपंच अनिता भिलाव आणि उपसरपंच संतोष ढोडरे यांनी विशेष पुढाकार घेतला. त्यांच्यासोबत ग्रामपंचायतीचे सर्व सदस्य, ग्रामविकास अधिकारी आणि ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून दिव्यांग बांधवांना प्रक्रियेत मदत केली. गावातील एकही दिव्यांग व्यक्ती शासकीय लाभापासून वंचित राहू नये, हाच आमचा प्रामाणिक प्रयत्न आहे, अशी भावना यावेळी सरपंच अनिता भिलाव यांनी व्यक्त केली.

सकाळी १०:३० वाजल्यापासूनच ग्रामपंचायत कार्यालयात दिव्यांग बांधवांनी हजेरी लावली होती. आधार कार्ड, फोटो आणि मोबाईल लिंक असलेल्या कागदपत्रांसह दिव्यांगांनी या शिबिराचा लाभ घेतला. युथ फॉर जॉब्स फाउंडेशनच्या या अभिनव उपक्रमाचे आणि ग्रामपंचायतीच्या तत्परतेचे परिसरात कौतुक होत आहे.

सरपंच, उपसरपंच यांचे आवाहन:-ज्या दिव्यांग बांधवांनी आजच्या शिबिराचा लाभ घेतला आहे, त्यांनी पुढील प्रशिक्षणासाठी फाउंडेशनच्या संपर्कात राहावे, असे आवाहन संयोजकांतर्फे करण्यात आले आहे.



# धार्मिक स्थळांसाठी ध्वनिक्षेपक परवाना अनिवार्य,केज मधील मंदिरांनी घेतला पुढाकार

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

सर्वोच्च न्यायालयाचे आदेश आणि गृहविभागा च्या मार्गदर्शक सूचनांनुसार,केज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांनी तालुक्यातील सर्व धार्मिक स्थळांना ध्वनिक्षेपक (लाऊडस्पीकर) परवाना घेणे बंधनकारक केले आहे.या मोहिमेला प्रतिसाद देत शिक्षक कॉलनी येथील विविध मंदिरांच्या वतीने अधिकृत परवाना प्राप्त करण्यात आला आहे.

**नियमांचे पालन विविध मंदिरांना परवाना सुपूर्द**

शिक्षक कॉलनीतील हनुमान मंदिर,दत्त मंदिर, विठ्ठल-रूखमाई मंदिर आणि महादेव मंदिर या देवस्थानांसाठीचा अधिकृत लाऊडस्पीकर परवाना आज केज पोलीस ठाण्यात प्रदान करण्यात आला.सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप मांजरमे आणि गुप्त वार्ता विभागाचे कागदे साहेब यांच्या हस्ते हा परवाना सुपूर्द करण्यात आला. याप्रसंगी पत्रकार प्रकाश मुंडे,वैभव सोनू धस आणि वैभव केंद्रे यांची प्रमुख उपस्थिती होती. पोलीस प्रशासनाचे आवाहन पोलीसनिरीक्षक स्वप्नील उनवणे यांनी स्पष्ट केले आहे की, आवाजाची मर्यादा आणि वेळेचे भान राखण्यासाठी परवाना असणे आवश्यक आहे.अटी व शर्तीसह हा परवाना विशिष्ट अटी आणि शर्तींसह देण्यात आला आहे.इतरांनाही आवाहन शहरातील व तालुक्यातील इतर सर्व धार्मिक स्थळांनी, मंडळांनी कायदेशीर कारवाई टाळण्यासाठी तातडीने पोलीस ठाण्याशी संपर्क साधून आपले परवाने मिळवून घ्यावेत,असे आवाहन पोलीस प्रशासनाकडून करण्यात आले आहे.



**कायद्याचे पालन करून धार्मिक उत्सव आणि दैनंदिन विधी साजरे करणे ही सर्वांची जबाबदारी आहे.शिक्षक कॉलनीतील मंदिर समितीने घेतलेला हा पुढाकार कौतुकास्पद आहे.**

**-स्वप्निल उणवने,पोलीस निरीक्षक,केज.**

# राज्यस्तरीय तिरंदाजी स्पर्धेत वेदांत चौरे यांचे यश,केजच्या विद्यार्थ्यांचा बहुमान

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

मध्यप्रदेश अमॅच्युअर आर्चरी असोसिएशन यांच्या वतीने दि.१० ते ११ जानेवारी २०२६ रोजी सिंगरौली येथे आयोजित १६ वी मिनी पंधरा वर्षांखालील व बाल तेरा वर्षांखालील व दहा वर्षांखालील राज्यस्तरीय तिरंदाजी अजिंक्यपद स्पर्धा उत्साहात पार पडली.या स्पर्धेत सागर जिल्ह्याचे उदयोन्मुख तिरंदाज वेदांत विष्णू चौरे जन्मतारीख १९ जुलै २०१६ याने उत्कृष्ट कामगिरी करत तृतीय क्रमांक पटकावला. इंडियन राउंड/रिकर्व्ह/कंपाऊंड प्रकारात वेदांत यांनी अचूक नेम साधत पदकाची कमाई केली.

स्पर्धेनंतर पारितोषिक वितरण समारंभात वेदांत यांना प्रमाणपत्र व पदक प्रदान करण्यात आले. त्यांच्या या यशाबद्दल कुटुंबीय,प्रशिक्षक व क्रीडाप्रेमींनी अभिनंदनाचा वर्षाव केला असून भविष्यातील स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.वेदांत हा केज येथील डॉ.सुरेश बिक्कड यांचा नातु आहे.




# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा डोंगरपिंपळा येथे राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती सोहळा संपन्न

दैनिक वादळ वार्ता

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

दिनांक १२ जानेवारी २०२६ रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा डोंगरपिंपळा येथे स्वराज्य जननी राजमाता जिजाऊ यांची जयंती आणि भारतीय संस्कृतीचे दूत स्वामी विवेकानंद यांची जयंती (राष्ट्रीय युवा दिन) मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री.माने सर यांच्या हस्ते राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमांचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आले.यावेळी श्री.मु.अ. कोरटवाड सर,श्रीमती कापसे मॅडम,श्री.माने सर,श्री.पोटलावर सर, श्री.पोपलघट सर,श्री. कचकलवार सर आणि श्री.राठोड सर या सर्व शिक्षक वृंदाची प्रमुख उपस्थिती होती.शिक्षकांचे प्रेरणादायी मनोगत या प्रसंगी बोलताना श्रीमती कापसे मॅडम यांनी राजमाता जिजाऊंच्या संस्कारांचे महत्त्व विषद केले.श्री.पोपलघट सर यांनी स्वामी विवेकानंद यांच्या जीवनातील ध्येयप्राप्तीचा मंत्र विद्यार्थ्यांना सांगितला. तसेच श्री.कचकलवार सर यांनी आजच्या युवकांनी या महापुरुषांचे विचार आचरणात आणण्याचे आवाहन केले.

विद्यार्थ्यांचे उत्स्फूर्त मनोगत विद्यार्थ्यांनीही अतिशय तयारीने आपले विचार मांडले.विद्यार्थ्यांनी राजमाता जिजाऊंच्या शौर्यावर पोवाडे आणि स्वामी विवेकानंदांच्या शिकागो परिषदेतील भाषणाचे अंश सादर करून उपस्थितांची मने जिंकली.आम्ही जिजाऊंचे संस्कार जपू आणि विवेकानंदांच्या विचाराने प्रगत भारत घडवू,असा निर्धार विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणातून व्यक्त केला.अध्यक्षीय भाषण श्री.माने सर यांनी आपल्या अध्यक्षीय मार्गदर्शनात सांगितले की, राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद ही दोन व्यक्तिमत्त्वे म्हणजे शक्ती आणि ज्ञानाचा संगम आहेत.जिजाऊंनी प्रतिकूल परिस्थितीत धैर्य शिकवले,तर स्वामी विवेकानंदांनी जगाला भारताच्या अध्यात्माची ताकद दाखवली. विद्यार्थ्यांनी या महान विभूतींचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून आपली शैक्षणिक प्रगती साधावी.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु.सिद्धी केंद्रे या विद्यार्थ्यांनीने केले तर उपस्थितांचे आभार श्री.राठोड सर यांनी मानून या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे व चैतन्याचे वातावरण निर्माण झाले होते.



# सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड मार्फत आयुष ईन्स्टिट्यूट फॉर ऍडिक्शन मॅनेजमेंट बार्शी येथे एक दिवसीय स्मार्ट निवेशक जागरूकता कार्यक्रम संपन्न

दैनिक वादळ वार्ता

**बार्शी । प्रतिनिधी**

भारत सरकारच्या भारतीय प्रतिभूती व विनिमय बोर्ड अर्थात (सेबी) तसेच सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड मार्फत आयुष ईन्स्टिट्यूट फॉर ऍडिक्शन मॅनेजमेंट,बार्शी येथे एक दिवसीय स्मार्ट निवेशक जागरूकता कार्यक्रम ईन्स्टिट्यूटच्या क्लायंटसाठी घेण्यात आला.कार्यक्रमाचे आयोजन ईन्स्टिट्यूटचे सी.ई.ओ.डॉ.संदीप तांबारे सर यांच्या मार्गदर्शना खाली करण्यात आले. कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून (सेबी) तसेच सी.डी.एस.एल चे सेक्युरिटीज मार्केट ट्रेनर श्री.गणेश चौधरी सर यांनी उपस्थितांना आर्थिक नियोजनाचे मार्गदर्शन केले.यात त्यांनी से.बी.तसेच सी.डी.एस. एल ची कार्यप्रणाली विशद केली तसेच बचत व बचतीचे महत्त्व समजावून सांगितले राष्ट्रीयकृत बँकेत असलेल्या विविधयोजना, डिमॅट अकाउंट,शेअर मार्केट,म्युच्युअल फंड, ई.टी.एफ व इतर शासकीय योजनांचे मार्गदर्शन केले.तसेच गुंतवणूक करत असताना काय काळजी घ्यावी व फसवणूक करणाऱ्या योजनांपासून सावध राहण्याच्या सूचना दिल्या. तसेच आर्थिक नियोजन हा व्यसनमुक्तीचा एक मार्ग होऊ शकतो त्यामुळे तो जीवनामध्ये अंगीकार करण्याचे आवाहन केले.

हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी समुपदेशक सिंधुताई शिनगारे मॅडम व सर्व स्टाफने विशेष परिश्रम घेत कार्यक्रमाचे आयोजन केले तर सूत्रसंचालन समुपदेशक श्री.स्वप्निल जाधव सर यांनी केले या कार्यक्रमास क्लायंट मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमात मोलाचे मार्गदर्शन केल्याबद्दल इन्स्टिटच्यूट चे सी.ई.ओ.डॉ.स्वप्निल तांबारे सर यांनी से.बी.व सी.डी.एस.एल यांचे आभार व्यक्त केले.



# भक्तीचा महाकुंभ: शहादा-धडगाव मार्गावर नर्मदा परिक्रमा वासियांची मांदियाळी; चिमुकल्यांचाही उत्साही सहभाग



दैनिक वादळ वार्ता

**रवींद्र वळवी मोलगी**

नर्मदेच्या पावन तीरावरून होणारी 'नर्मदा परिक्रमा' म्हणजे श्रद्धा आणि संयमाची कसोटी. सध्या शहाद्याकडून धडगाव-मोलगी मार्गे गुजरातच्या दिशेने जाणाऱ्या नर्मदा परिक्रमावासियांच्या संख्येमुळे या संपूर्ण परिसरातील वातावरण भक्तिमय झाले आहे. पहाटेच्या कडाक्याच्या थंडीतही 'नर्मदे हर'च्या जयघोषाने रस्ते दुमदुमून जात आहेत.

**पहाटेपासून प्रवासाला सुरुवात**

नोव्हेंबर महिन्यापासून या परिक्रमेला खऱ्या अर्थाने वेग येतो. शहादा परिसरात मुक्कामाला असलेले भाविक पहाटे ५ ते ६ वाजेच्या सुमारास आपल्या पुढच्या प्रवासाला सुरुवात करतात. पांढरा शुभ्र पेहराव, पाठीवर सामानाची बॅग, हातात काठी, पाण्याची बाटली आणि विश्रांतीसाठी सोबत असलेले थर्माकोलचे अंथरुण अशा सात्विक अवतारातील हे भाविक सध्या रस्त्यावरून जाताना नागरिकांचे लक्ष वेधून घेत आहेत.

**बालकांचा सहभाग ठरतोय आकर्षणाचे केंद्र**

यावर्षीच्या परिक्रमेचे खास वैशिष्ट्य म्हणजे वयस्कर भाविकांसोबतच लहान मुलांचाही लक्षणीय सहभाग दिसून येत आहे. कडाक्याची थंडी आणि दररोजचा मैलोन्मैल पायी प्रवास असूनही, या बालकांच्या चेहऱ्यावरील उत्साह वाखाणण्याजोगा आहे. पालकांसोबत खांद्याला खांदा लावून ही मुले नर्मदा मातेच्या जयघोषात परिक्रमा पूर्ण करत आहेत.

**परिक्रमेचे आध्यात्मिक महत्त्व**

मध्यप्रदेशातील अमरकंटक येथून या यात्रेचा उगम होतो. समुद्रसपाटीपासून ३,६०० फूट उंचीवर असलेल्या या तीर्थक्षेत्री नर्मदा मातेचे उगम कुंड आणि ३४ सफेद रंगाची प्राचीन मंदिरे आहेत.

नदीचा विस्तार: नर्मदा नदीला एकूण ४१ सहाय्यक आणि ४९ उपनद्या मिळतात.

परिक्रमेचे प्रकार: ही यात्रा प्रामुख्याने 'नर्मदा पंचक्रोशी' आणि 'पूर्ण परिक्रमा' अशा दोन पद्धतीने केली जाते.

नियम: साधारण सहा महिने चालणारा हा प्रवास ज्या ठिकाणी सुरू होतो, त्याच ठिकाणी त्याची सांगता होते. पायी प्रवासाला या यात्रेत अनन्यसाधारण महत्त्व आहे.

शहादा, धडगाव आणि मोलगी या दुर्गम भागातून जाणारे हे परिक्रमावासी सध्या या परिसरातील जनजीवनावर भक्तीची छाप पाडत आहेत.

# महेश विद्यालय शेवडी (बा) येथे २००१-०२ बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमिलन सोहळा उत्साहात



दैनिक वादळ वार्ता

**लोहा । राजकुमार पिल्लोळे**

लोहा तालुक्यातील शेवडी (बा) येथील महेश विद्यालयात इ.स. २००१-०२ या बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमिलन सोहळा दिनांक १५ जानेवारी २०२६ रोजी आनंदी व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. तब्बल दोन दशकांनंतर पुन्हा एकत्र आलेल्या वर्गमित्रांनी शालेय आठवणींना उजाळा देत आपुलकीचे बंध अधिक घट्ट केले.कार्यक्रमाच्या प्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक श्री. डी. एन. पवार सर व सौ. भोसीकर मॅडम यांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. याच बॅचचे शिक्षक श्री. गोविंद उदगिरे सर यांनी मनोगतातून जुन्या काळातील आठवणी सांगत, तंत्रज्ञान नसतानाही मैत्रीची नाळ आजही तशीच घट्ट असल्याचे भावनिक शब्दांत व्यक्त केले. स्नेहमिलनात गीतांची मैफल, गप्पागोष्टी तसेच खो-खोसारखे पारंपरिक खेळ खेळण्यात आले. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे बळीराम शिराळे यांनी मुंबई-अलिबाग येथून सुमारे ५०० किलोमीटरचा प्रवास करून सकाळी लवकर शाळेत उपस्थिती लावली. तसेच संतोष वाघमारे यांनी सर्व वर्गमित्रांसाठी गुलाबाची फुले आणून स्वागत केल्याने वातावरण अधिक भावनिक झाले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांनी तिळगुळ देऊन मकर संक्रांतीच्या शुभेच्छा दिल्या. आनंद, आठवणी आणि आपुलकीने भरलेला हा स्नेहमिलन सोहळा सर्वांच्या मनात कायमचा ठसा उमटवून गेला.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077